# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक १८२) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शुक्रवार, दि.१७ जुलै २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## एसआयआर करण्यासाठी मुदतवाढ दिल्लीसाठी महाराष्ट्रासाठी नाही

नवी दिल्ली दि.१६ (वृत्तसंस्था)- भारत निवडणूक आयोगाने दिल्लीतील मतदार यादीच्या विशेष संघन पुनरावलोकन प्रक्रियेचे सुधारित वेळापत्रक जाहीर केले आहे. १ जुलै २०२६ ही पात्रता तारीख निश्चित ठेवून ही सुधारित अधिसूचना जारी करण्यात आली आहे. निवडणूक आयोगाने दिल्लीचे मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या विनंतीनुसार सुधारित कार्यक्रम निश्चित केला असून त्यानुसार बूथ लेव्हल अधिकारी यांच्याकडून घराघर सर्वेक्षण ३० जून ते ८ ऑगस्ट २०२६ या कालावधीत होणार आहे. मतदान केंद्रांचे पुनर्रचना व पुनर्व्यवस्थापन ८ ऑगस्ट २०२६ रोजी पूर्ण केले जाईल. सुधारित वेळापत्रकानुसार मतदार यादीचा प्रारूप मसुदा १७ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध केला जाणार आहे. त्यानंतर १७ ऑगस्ट ते १६ सप्टेंबर २०२६ या कालावधीत दावे व हरकती स्वीकारल्या जातील. दावे व हरकतींची सुनावणी व निकाली काढण्याची प्रक्रिया १७ ऑगस्ट ते १५ ऑक्टोबर २०२६ दरम्यान पार पडेल. त्यानंतर १९ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. या सुधारित कार्यक्रमाची माहिती सर्व संबंधित अधिकारी, कर्मचारी आणि राजकीय पक्षांना देण्याचे निर्देश निवडणूक आयोगाने दिले असून, विविध माध्यमांतून या वेळापत्रकाचा व्यापक प्रसार करण्यासही सांगितले आहे. आसआयआर मुदतवाढ दिल्लीसाठी निवडणूक आयोगाने दिली आहे. महाराष्ट्रासाठी नाही नजरचुकीने हि बातमी प्रकाशित झाली त्याबद्दल दिलगिर आहोत. निवडणूक आयोगाने महाराष्ट्रासाठी मुदतवाढ दिल्याचे पत्र निघाल्यावर सुधारीत बातमी पुन्हा प्रकाशित केली जाईल.

## सोनम वांगचुक यांच्या उपोषणाने तब्बल ९ किलो वजन घटले; प्रकृती खालावल्याने जीव धोक्यात

नवी दिल्ली दि.१६ (वृत्तसंस्था)- सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या उपोषणाचा आज (१६ जुलै) १९ वा दिवस आहे. त्यांच्या ढासळत्या प्रकृतीसंदर्भात दाखल केलेल्या जनहित याचिकेवर दिल्ली उच्च न्यायालय आज सुनावणी घेणार आहे. या याचिकेत केंद्र आणि दिल्ली सरकारला वांगचुक यांना रुग्णालयात दाखल करण्याचे आणि गरज पडल्यास त्यांना जबरदस्तीने अन्न भरवण्याचे निर्देश देण्याची मागणी करण्यात आली आहे. सोनम वांगचुक २० जूनपासून जंतर मंतर येथे कॉकरोच जनता पार्टीच्या (सीजेपी) आंदोलनात सहभागी झाले आहेत. नीट परीक्षेतील अनियमिततेबद्दल केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासह परीक्षा पद्धतीत सुधारणा करण्याच्या मागणीसाठी ते अनिश्चित काळासाठी उपोषणावर आहेत.

न्यायमूर्ती डी. के. उपाध्याय आणि न्यायमूर्ती तेजस कारिया यांच्या दिल्ली उच्च न्यायालयाच्या खंडपीठाला सरकारी पक्षाच्या अनुपस्थितीमुळे बुधवारी या प्रकरणाची सुनावणी होऊ शकली नाही. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन, न्यायालयाने हे प्रकरण गुरुवारी सुनावणीसाठी सूचीबद्ध केले आणि केंद्र व दिल्ली सरकारकडून प्रतिसाद मागवला आहे. या याचिकेत वांगचुक यांच्यावर तातडीच्या उपचारांची मागणी करण्यात आली आहे. याचिकाकर्ते राकेश कुमार सैनी यांनी म्हटले आहे की, जर उपोषण सुरूच राहिले, तर येत्या काही दिवसांत वांगचुक यांचा जीव धोक्यात येऊ शकतो. वांगचुक यांना तातडीने आपत्कालीन उपचार, जीव वाचवणारी काळजी आणि आवश्यक पोषण पुरवले पाहिजे.

या याचिकेत म्हटले आहे की, सरकारची निष्क्रियता चिंताजनक आहे आणि कोणत्याही नागरिकाला स्वेच्छेने उपासमारीने मरू दिले जाऊ शकत नाही. सरकारने आंदोलनाशी संबंधित मुद्द्यांवर संवाद सुरू केला पाहिजे. न्यायालयाला विनंती करण्यात आली आहे की, सरकारने वांगचुक यांच्याशी संवाद साधावा आणि गरज पडल्यास त्यांना जबरदस्तीने अन्न खाऊ घालण्याची परवानगी द्यावी.

सीजेपीने आरोप केला आहे की, विद्यार्थ्यांसाठी आवाज उठवणाऱ्या वांगचुक यांना सरकारकडून केवळ मौन मिळाले आहे. सीजेपीचे संस्थापक अभिजीत दीपके म्हणाले की, सरकार जबाबदारी टाळत आहे आणि त्यांची वृत्ती क्रूर आहे. अमेरिकेतील हिंदू फॉर ह्युमन राइट्स या संघटनेनेही वांगचुक यांच्या प्रकृतीबद्दल चिंता व्यक्त केली आहे. संघटनेने पंतप्रधान मोदींना आंदोलकांशी संवाद साधण्याचे, त्यांच्या मागण्यांना ठोस प्रतिसाद देण्याचे आणि परीक्षा पद्धतीत उत्तरदायित्व सुनिश्चित करण्याचे आवाहन केले आहे.

१८ दिवसांच्या उपोषणात वांगचुक यांचे वजन जवळपास ९ किलोने कमी होऊन ५७.१५ किलो झाले आहे. पक्षाच्या म्हणण्यानुसार वांगचुक यांची प्रकृती गंभीर आहे. डॉक्टरांच्या मते ते पूर्णपणे शुद्धीवर आहेत, परंतु सुरू



असलेल्या उपोषणाचा त्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहे. लडाखला पूर्ण राज्याचा दर्जा देण्याच्या मागणीसाठी वांगचुक यांनी यापूर्वी जोधपूर तुरुंगात १७० दिवस घालवले होते. त्यांच्यावर २४ सप्टेंबर २०२५ रोजी उपोषणादरम्यान लेहमध्ये हिंसाचार भडकवल्याचा आरोप होता, ज्यात चार जणांचा मृत्यू झाला आणि ९० जण जखमी झाले. सरकारने वांगचुक यांच्यावर कथित हिंसाचार भडकवल्याचा आरोप केला आहे. दोन दिवसांनंतर, २६ सप्टेंबर रोजी, त्याला राष्ट्रीय सुरक्षा कायद्या अंतर्गत ताब्यात घेऊन जोधपूर तुरुंगात पाठवण्यात आले.

## १३६ पैकी चक्क १११ प्रश्न हुबेहूब मॅच!

### मोबाईलमधील पीडीएफने उघड केला 'नीट' पेपर लीकचा कट; सीबीआयचा कोर्टात खुलासा

नवी दिल्ली दि.१६ (वृत्तसंस्था)- देशभरातील लाखो विद्यार्थ्यांचे भवितव्य पणाला लावणाऱ्या बहुचर्चित 'नीट-युजी'पेपर लीक प्रकरणात केंद्रीय अन्वेषण विभागाने कोर्टात एक अत्यंत धक्कादायक आणि खळबळजनक खुलासा केला आहे. महाराष्ट्र कनेक्शनचा तपास करताना लातूरमधील नामांकित कोचिंग क्लासेसचा चालक शिवराज मोटेगावकर याच्या मोबाईल फोनमधून सीबीआयला हस्तलिखित १३६ प्रश्नांची यादी सापडली होती. यातील तब्बल १११ प्रश्न नॅशनल टेस्टिंग एजन्सीच्या मास्टर प्रश्नपत्रिकेशी हुबेहूब जुळत असल्याचे तपासात समोर आले आहे. सीबीआयच्या या नव्या खुलाशामुळे नीट पेपर लीक झाल्याच्या दाव्याला आता मोठे कायदेशीर बळ मिळाले आहे.

शिवराज मोटेगावकर हा लातूरमध्ये 'रेणुकाई केमिस्ट्री क्लासेस' या नावाने प्रसिद्ध कोचिंग इन्स्टिट्यूट चालवत होता. तसेच 'मोटेगावकर सर आरसीसी' या नावाने त्याचा यूट्यूब चॅनल असून त्याचे १.६ लाखांहून अधिक सबस्क्रायबर्स आहेत.

ाबीआयने कोर्टात दिलेल्या माहितीनुसार, नीट-युजीची मुख्य परीक्षा ३ मे रोजी होणार होती. मात्र, आरोपी शिवराज मोटेगावकर याला तब्बल १० दिवस आधी म्हणजेच २३ एप्रिल रोजीच लीक झालेले प्रश्न मिळाले होते. हे प्रश्न त्याला लातूरचे डॉक्टर मनोज शिरूर आणि एनटीएचे माजी सदस्य व केमिस्ट्रीचे लेक्चरर व्ही. पी. कुलकर्णी यांच्या माध्यमातून मिळाल्याचा आरोप सीबीआयने केला आहे. मोटेगावकरच्या जामीन अर्जाला विरोध करताना सीबीआयने कोर्टासमोर हा पुरावा सादर केला आहे. मुख्य आरोपी सध्या अटकेत आहे. सीबीआयच्या तपासात या काळ्या बाजाराचे आणखी एक भयंकर रूप समोर आले आहे. टेलिग्राम ॲपच्या माध्यमातून या लीक झालेल्या प्रश्नपत्रिकेची पीडीएफ तब्बल १० लाख रुपयांना विकली जात होती. इतकेच नाही तर परीक्षेच्या काही दिवस आधी नीटची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये १५० पानांचा एक तथाकथित 'गेस पेपर' फिरत होता, ज्यामध्ये ४१० प्रश्न होते. धक्कादायक बाब म्हणजे, या ४१० प्रश्नांपैकी केवळ केमिस्ट्री विभागाचे १२० प्रश्न मूळ पेपरशी मॅच होत होते. म्हणजेच, परीक्षार्थींच्या एका मोठ्या गटाला प्रश्नपत्रिकेचा मुख्य भाग आधीच मिळाला होता, असा दावा तपास यंत्रणेने केला आहे. नीट पेपर लिकचा हा तपास सुरुवातीला राजस्थान आणि उत्तराखंडपुरता मर्यादित होता. मात्र, राजस्थानमध्ये विद्यार्थ्यांमध्ये फिरणाऱ्या 'गेस पेपर' आणि मूळ प्रश्नपत्रिकेमध्ये कमालीचे साम्य आढळून आले. जवळपास १०० हून अधिक प्रश्न जसेच्या तसे मॅच झाल्याचे समोर आल्यानंतर राजस्थानच्या स्पेशल ऑपरेशन्स ग्रुपने गुन्हा दाखल केला. या प्रकरणाची पाळेमुळे शोधताना तपास यंत्रणांना राजस्थान, हरियाणा, दिल्ली आणि थेट महाराष्ट्रापर्यंत पसरलेल्या एका मोठ्या संघटित रॅकेटचा सुगावा लागला. यामध्ये प्रश्नपत्रिका सेट करणाऱ्यांपासून ते मध्यस्थी, कोचिंग चालक आणि विद्यार्थ्यांचा समावेश होता. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन हा तपास सीबीआयकडे सोपवण्यात आला आणि त्यानंतर लातूरच्या कोचिंग चालकाचे हे धक्कादायक कनेक्शन उघड झाले. या कथित पेपर लीकच्या मोठ्या वादामुळे नॅशनल टेस्टिंग एजन्सीला ३ मे रोजी झालेली परीक्षा रद्द करावी लागली होती आणि २१ जून रोजी देशभरात पुन्हा परीक्षा घेण्याचे आदेश द्यावे लागले होते, ज्यामुळे देशभरातील २० लाखांहून अधिक विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला लागले होते.

## सोनम वांगचुक, अभिजीत दिपकेंच्या समर्थनार्थ आदित्य ठाकरे मैदानात; रविवारी शिवतीर्थावर आंदोलनाची हाक

मुंबई दि.१६ (प्रतिनिधी)- नीट पेपरफुटीप्रकरणी सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक गेल्या १९ दिवसांपासून दिल्लीत उपोषण करत आहेत. कॉक्रोच जनता पार्टीच्या अभिजीत दिपकेंनी उभारलेल्या आंदोलनाला देशभरातून पाठिंबा वाढत असताना, वांगचुक आणि दिपके यांच्या समर्थनात आदित्य ठाकरेंनी मैदानात उतरण्याचा निर्णय घेतला आहे. वांगचुक आणि दिपकेंना पाठिंबा देण्यासाठी रविवारी (१९ जुलै) शिवतीर्थावर एकत्र येण्याचे आवाहन आदित्य ठाकरेंनी केले आहे. "हा लढा राजकीय पक्षाचा नसून, सर्वांचा आहे", असेही ठाकरेंनी म्हटले आहे.

नीट पेपरफुटीप्रकरणी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा आणि मृत विद्यार्थ्यांना आर्थिक मदत देण्यात यावी, या प्रमुख मागण्यांसाठी कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपकेंनी आंदोलन उभारले आहे. दिल्लीत गेल्या २५ दिवसांपासून हे आंदोलन सुरु आहे. यात सोनम वांगचुक यांनी सहभागी होत उपोषणाची हाक दिली. गेल्या १९ दिवसांपासून वांगचुक उपोषण करत असून, सरकारकडून अद्याप प्रतिसाद मिळालेला नाही. दरम्यान, वांगचुक यांच्या समर्थनात अनेक राजकीय नेते, अभिनेते, सामाजिक कार्यकर्ते उतरले आहेत. आदित्य ठाकरेंनी देखील आता वांगचुक आणि दिपकेंच्या समर्थनात रस्त्यावर उतरण्याचा निर्णय घेतला आहे. वांगचुक, दिपके आणि युवकांनी पाठिंबा देण्यासाठी व भाजपा सरकारला जाब विचारण्यासाठी एकत्र येऊया, असे आवाहन आदित्य ठाकरेंनी केले आहे. १९ जुलै, रविवारी, शिवतीर्थावर, माँसाहेब मिनाताई ठाकरे यांच्या पुतळ्याजवळ ४ वाजता एकत्र येण्याचे आवाहन आदित्य यांनी केले आहे. "हा लढा राजकीय पक्षाचा नसून, सर्वांचा आहे", असेही ठाकरेंनी पुढे म्हटले आहे. उद्धव ठाकरेंनी देखील काही दिवसांपूर्वी दिपके आणि वांगचुक यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. आता आदित्य यांनी दिपके आणि वांगचुक यांच्या समर्थनात प्रत्यक्ष रस्त्यावर उतरण्याचा निर्णय घेतला आहे.

## प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे कपटी नेते; राष्ट्रवादीतील घडामोडींवर अंजली दमानियांची टीका

मुंबई दि.१६ (प्रतिनिधी)- सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमधील अंतर्गत घडामोडींवर भाष्य करत प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांच्यावर गंभीर टीका केली आहे. हे दोघेही 'अतिशय कपटी नेते' असून पक्षात मोठा राजकीय कट सुरू असल्याचा दावा त्यांनी केला. तसेच, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी वेळेत सावध होण्याची गरज असल्याचेही त्या म्हणाल्या.

एका वृत्तवाहिनीशी बोलताना दमानिया म्हणाल्या की, प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांच्या हालचालींकडे बारकाईने पाहण्याची आवश्यकता आहे. सध्या ज्या प्रकारच्या घडामोडी सुरू आहेत, त्यावरून पक्षांतर्गत काहीतरी मोठा कट रचला जात असल्याचे दिसत आहे. त्यांनी दावा केला की, पक्षातील एका व्यक्तीने निवडणूक आयोगाकडे पत्र पाठवून पक्षातील झालेली निवडणूक बेकायदेशीर असल्याचा दावा केला आहे. या घडामोडी स्वतंत्र नसून त्यामागे नियोजनबद्ध रणनीती असल्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली.

दमानिया म्हणाल्या की, सुनेत्रा पवार या सक्रिय राजकारणात तुलनेने नव्या असल्यामुळे त्यांना या घडामोडींची पूर्ण कल्पना नसावी. त्यामुळे त्यांच्याविरोधात कोणत्या प्रकारचे राजकीय डावपेच रचले जाऊ शकतात, याचा अंदाज त्यांना येत नसल्याचे दिसते. 'हे त्यांना जितक्या लवकर समजेल तितके त्यांच्या दृष्टीने चांगले ठरेल,' असे त्यांनी म्हटले.

## जगन्नाथ पुरीच्या रथयात्रेत श्वास कोंडल्याने एकाचा मृत्यू, ३० पेक्षा जास्त भाविक बेशुद्ध झाल्याने रुग्णालयात

पुरी दि.१६ (वृत्तसंस्था)- जगन्नाथ पुरीच्या रथयात्रेत पहिल्याच दिवशी भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी झाली. ही गर्दी इतकी प्रचंड होती की श्वास कोंडल्याने एका भाविकाचा मृत्यू झाला. तर ३० पेक्षा जास्त भाविकांना शुद्ध हरपल्याने रुग्णालयात दाखल करण्यात आलं. पुरी या ठिकाणी ग्रँड रोड या ठिकाणी रथ यात्रेच्या वेळी अभूतपूर्व गर्दी झाली. ज्यामुळे ४५ वर्षांचा एक भाविक बेशुद्ध झाला. त्याला तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं. पण डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केलं. यानंतर ही माहितीही समोर आली आहे की ३० हून अधिक भाविक बेशुद्ध झाले आहेत ज्यांच्यावर उपचार सुरु आहेत.

जगन्नाथ पुरीची यात्रा ही दरवर्षी याच महिन्यात असते. या ठिकाणी लाखो भाविक उपस्थित राहात असतात. यावेळी अभूतपूर्व गर्दी झाली आहे. या गर्दीत अनेकांना श्वास घेण्यासही त्रास होतो आहे. पीटीआयच्या वृत्तानुसार श्वास गुदमरल्याने ज्यांना चक्कर आली अशा ३० हून अधिक भाविकांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे आणि त्यांच्यावर उपचार सुरु करण्यात आले आहेत.

आरोग्य अधिकाऱ्याने इंडियन एक्स्प्रेसला दिलेल्या माहितीनुसार ३० हून अधिक भाविक गर्दीमुळे बेशुद्ध झाले आहेत. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. तसंच आम्ही अतिरिक्त आरोग्य कर्मचारीही त्यांची काळजी घेण्यासाठी नेमले आहेत. ओडिशामध्ये बराच पाऊस आहे तरीही पुरी या ठिकाणी जगन्नाथाची यात्रा पाहण्यासाठी ५ लाखांहून अधिक भाविक आले आहेत. जगन्नाथ यात्रा पाहण्यासाठी गर्दी झाल्याने अनेकांचा श्वास कोंडला आणि ते बेशुद्ध झाले. ज्यानंतर आपात्कालीन बचाव पथकाने अनेक भाविकांना तातडीने स्ट्रेचरच्या मदतीने सुरक्षित स्थळी पोहचवलं. सुरक्षा कर्मचारी आणि आपात्कालीन विभागाचे अधिकारी, कर्मचारी हे तातडीने लोकांच्या मदतीला धावले आहेत. मोठ्या प्रमाणावर भाविकांची गर्दी झाली आहे तरीही शुद्ध हरपलेल्या भाविकांना तातडीने आम्ही रुग्णालयात दाखल केलं आहे आणि त्यांची काळजी घेतली जाते आहे.

## लवासा प्रकरणी पवार कुटुंबाला सुप्रीम कोर्टाचा दिलासा

नवी दिल्ली/मुंबई दि.१६ (वृत्तसंस्था)- अनेक वर्षांपासून राजकीय आणि न्यायालयीन वर्तुळात गाजत असलेल्या बहुचर्चित 'लवासा हिल स्टेशन' गैरव्यवहार प्रकरणात राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार आणि त्यांच्या कुटुंबीयांना सर्वोच्च न्यायालयाने आज सर्वात मोठा दिलासा दिला आहे. या प्रकरणाची सीबीआय चौकशी करावी आणि शरद पवार, सुप्रिया सुळे व दिवंगत नेते अजित पवार यांच्यासह इतरांवर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने पूर्णपणे फेटाळून लावली आहे.

सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने याचिकाकर्त्याच्या हेतूवरच तीव्र शब्दांत बोट ठेवले. 'याचिकाकर्त्याच्या हेतूबद्दल शंका आहे. आम्ही या प्रकरणात अजिबात हस्तक्षेप करणार नाही,' असे स्पष्ट व महत्त्वपूर्ण निरीक्षण सरन्यायाधीशांनी नोंदवले. या निकालामुळे लवासा प्रकल्पावरून पवारांवर होणाऱ्या आरोपांच्या प्रकरणाला आता पूर्णविराम मिळाला आहे.

## एमपीएससीच्या विद्यार्थ्यांसाठी दिलासा; ऑनलाइन परीक्षेचा निर्णय लांबणीवर, ऑगस्ट २०२७ पासून होणार अंमलबजावणी

मुंबई दि.१६ (प्रतिनिधी)- विविध विद्यार्थी संघटनांकडून सातत्याने होत असलेल्या मागण्यांची राज्य सरकारने गंभीर दखल घेतली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षा पद्धतीत होणाऱ्या बदलांबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मुंबईत एक महत्त्वाची बैठक घेतली. या बैठकीत विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करत, एमपीएससीची संगणकआधारित (ऑनलाईन) परीक्षा पद्धत लगेचच लागू न करता, ती ऑगस्ट २०२७ पासून अंमलात आणण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. तोपर्यंत सर्व परीक्षा या सध्याच्या प्रचलित (ऑफलाईन) पद्धतीनेच घेतल्या जाणार आहेत.

या महत्त्वपूर्ण बैठकीला एमपीएससीचे अध्यक्ष विवेक भीमनवार, राज्याचे मुख्य सचिव आणि सामान्य प्रशासन विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी परीक्षा प्रक्रियेबाबत सरकारची भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, 'राज्यात एक सुरक्षित आणि पारदर्शी निवड प्रक्रिया असावी, हा कायमच माझा आग्रह राहिला आहे. त्यादृष्टीने परीक्षापद्धती सुद्धा पूर्णपणे पारदर्शीच असली पाहिजे. विद्यार्थ्यांच्या परीक्षा वेळेत झाल्या पाहिजेत आणि त्याचे निकाल सुद्धा वेळेतच लागले पाहिजेत, यावर आपला भर आहे.'

एमपीएससीने संगणकआधारित परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, या निर्णयाला अनेक विद्यार्थ्यांचा विरोध होता. यावर तोडगा काढताना मुख्यमंत्री म्हणाले की, 'सुधारणांचा हा क्रम हाती घेताना एका व्यवस्थेकडून दुसऱ्या व्यवस्थेकडे मार्गक्रमण करणे तितकेच सुरळीत असले पाहिजे. या मोठ्या बदलासाठी प्रत्येक यंत्रणेला सज्जतेसाठी पुरेसा अवधी मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे टप्प्या-टप्प्याने या सुधारणा राबवत संगणकआधारित परीक्षांची प्रक्रिया ही लगेच लागू न करता ऑगस्ट २०२७ पासून अंमलात आणावी.'

या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना नवीन परीक्षा पद्धतीसाठी सराव करायला आणि मानसिकरीत्या तयार व्हायला पुरेसा वेळ मिळणार आहे. तसेच, सरकारी यंत्रणांनाही आपली सज्जता वाढवता येईल. तोपर्यंत एमपीएससीच्या सर्व परीक्षा या विद्यमान प्रचलित पद्धतीनेच (सध्याच्या ऑफलाईन पद्धतीने) घ्याव्यात, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. त्यानुषंगाने आता पुढील अधिकृत निर्णय एमपीएससीने घ्यावा, असे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सूचित केले आहे.

## आम्ही सुनेत्रा पवारांना सगळ्या गोष्टी सांगतो, आमच्या पक्षात कुठलाही गैरसमज नाही-सुनील तटकरे

मुंबई दि.१६ (प्रतिनिधी)- आमच्या पक्षात कुठलाही गैरसमज नाही. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाबाबत सध्या ज्या चर्चा सुरू आहेत, त्या चुकीच्या आहेत. शरद पवार गटाचे आमदार जयंत पाटील आणि आमची भेट देखील झालेली नाही, असं राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे म्हणाले. तसेच पक्षात कधी अविश्वास आहे, असं कधी ऐकलं नाही, असंही सुनील तटकरे यांनी स्पष्ट केलं.

अजितदादा असताना राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणाच्या चर्चा झाल्या होत्या. मात्र अजितदादांच्या निधनानंतर विलिनीकरणाच्या चर्चांना पूर्णविराम लागला, असंही सुनील तटकरेंनी सांगितले. तसेच मी खासदार आहे. मुख्यमंत्र्यांची प्रत्येकवेळी होणारी भेट राजकीय असते, असं नाही. मतदारसंघातील कामे देखील असतात. ज्यावेळी राजकीय बैठका असतात, त्यावेळी सुनेत्रा पवार यांना त्याबाबत माहिती असते. मी ४० वर्षे राजकारणात आहे. मला राजशिष्टाचार माहिती आहे, असं सुनील तटकरे यांनी स्पष्ट केलं. तसेच सुनील तटकरे आणि प्रफुल पटेल यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांसोबत झालेल्या बैठकीबाबत सुनेत्रा पवार यांना अंधारे ठेवल्याची चर्चा रंगली होती. मात्र सुनेत्रा पवार आणि आमच्यात चांगलं टूनिंग आहे. सुनेत्रा पवारांना आम्ही सगळ्या गोष्टी सांगतो, असंही सुनील तटकरे म्हणाले.

गेल्या अधिवेशनात डिलिमिटेशन आलं, त्यावेळी मी मतदान केलं आहे. त्यांच्या (शरद पवारांची राष्ट्रवादी) पक्षाने पाठिंबा द्यावा, न द्यावा हा त्यांचा प्रश्न आहे. सुप्रिया सुळे यांचं म्हणणं देखील मी ऐकलं आहे. डिलिमिटेशन बिलाला समर्थन करणं, म्हणजे एनडीएसोबत आलं असा अर्थ होतं नाही, असंही सुनील तटकरे म्हणाले.

## देवाभाऊ कृतज्ञता सेवा सप्ताहांतर्गत रथयात्रेत भाविकांना महाप्रसाद वाटप

छत्रपती संभाजीनगर दि.१६ (प्रतिनिधी)- महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त दि. १६ ते २२ जुलै या कालावधीत 'देवाभाऊ कृतज्ञता सेवा सप्ताह' विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात येत आहे. या सेवा सप्ताहाचे आयोजन स्थायी समितीचे सभापती अनिल मकरिये यांच्या पुढाकाराने शहरातील विविध ठिकाणी करण्यात आले आहे.

या उपक्रमांतर्गत आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ (इस्कॉन) यांच्या वतीने आयोजित भगवान श्री जगन्नाथ रथयात्रेत सहभागी झालेल्या हजारो भाविकांना देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी रथयात्रेच्या माध्यमातून स्वच्छतेचा संदेशही देण्यात आला. भगवान श्री जगन्नाथांची ही भव्य रथयात्रा गांधी चौक, सराफा बाजार रोड, मच्छली खडक, गुलमंडी, संभाजीपेठ, नागेश्वरवाडी, निराला बाजार, समर्थ नगर, भाग्यनगर आदी प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत इस्कॉन मधुवन येथे पोहोचली.

विविध ठिकाणी नागरिक व भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत भगवान जगन्नाथांचे दर्शन घेतले आणि रथयात्रेचे स्वागत केले. अखेरीस इस्कॉन मधुवन येथे महाआरतीनंतर रथयात्रेची भक्तिमय वातावरणात सांगता झाली.

'देवाभाऊ कृतज्ञता सेवा सप्ताह' अंतर्गत पुढील काही दिवसांतही विविध सामाजिक, धार्मिक व जनकल्याणकारी उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.



## 'आम्ही ट्रम्प यांना ठार मारू', काळ्या शवपेटीत ट्रम्प यांच्या फोटोसह इराणमध्ये झळकला भलामोठा बॅनर

तेहरान दि.१६ (वृत्तसंस्था)- अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्ष पुन्हा एकदा तीव्र झाला आहे. दोन्ही देशांनी एकमेकांवर हल्ले करण्यास सुरुवात केली आहे. अलिकडेच इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यविधीला एकत्र आलेल्या जमावाने डोनाल्ड ट्रम्प यांना ठार करा, अशा घोषणा दिल्या. त्यानंतर आता इराणची राजधानी तेहरानमध्ये भलामोठा फलक उभारण्यात आला असून, त्यावर एका काळ्या शवपेटीत डोनाल्ड ट्रम्प यांचा फोटो दिसत आहे, आणि फलकावर 'आम्ही ट्रम्प यांना ठार मारू', असा संदेश लिहण्यात आला आहे.

तेहरान शहराच्या मध्यवर्ती भागात हा भलामोठा फलक उभारण्यात आला आहे. त्यावर एका मोठ्या काळ्या शवपेटीत डोनाल्ड ट्रम्प यांचा फोटो दिसत आहे. तर, फलकावर खाली पर्शियन आणि इंग्रजी भाषेत विविध संदेश लिहण्यात आले आहेत. यात 'आम्ही ट्रम्प यांना ठार मारू', असा इंग्रजी संदेश देखील लिहण्यात आला आहे. शवपेटीत डोनाल्ड ट्रम्प यांचा काळ्या कोट, लाल रंगाची टाय, हाताची घडी, डोकं आणि पाय शवपेटीतून स्पष्ट दिसतील असे दाखवण्यात आले आहे.

फलकावरील फोटो डोनाल्ड ट्रम्प यांचे अंत्यविधी सदृष्य चित्र दाखविण्यात आले आहे. या फलकावर डोनाल्ड ट्रम्प यांना ठार करु, असा संदेश लिहण्यात आला आहे. या शिवाय मिनाब शाळेतील मुलांच्या स्मृतिप्रीत्यर्थ असाही संदेश लिहण्यात आला आहे. अमेरिका आणि इस्त्रायलच्या संयुक्त हल्ल्यात मिनाब येथील शाळेतील अनेक लहान मुलांचा मृत्यू झाला होता. २८ फेब्रुवारी रोजी झालेल्या हल्ल्यात अयातुल्ला अली खामेनी यांचा देखील मृत्यू झाला होता.

# विकास की विनाश? झाडांच्याच मुळावर घाव

विकासाच्या हव्यासापायी निसर्गाचा बळी देणाऱ्या आणि पर्यावरण संतुलनापेक्षा कागदोपत्री आकडेवारीला महत्त्व देणाऱ्या या प्रवृत्तीचा जर असाच कळस होत राहिला, तर भविष्यातील 'विकासगंगा' ही मानवाच्या अस्तित्वासाठीच कदाचित प्रलयकारी ठरेल, याची वेळीच जाणीव ठेवायला हवी.

विकासकामांचे खर शत्रू कोणी असतील, तर ती झाडं! वर्षानुवर्ष एकाच जागी नुसती उभी राहून ती किती जागा बळकावून आहेत, याची जाणीव सर्वसामान्य माणसाला नाही. ज्याला जमिनीच्या स्क्वेअर फुटाचा आणि हवेतल्या एफएसआयचा भाव समजतो, त्यालाच विकासाची खरी दृष्टी असते, असं मानलं जातं, ते उगीच नाही. रस्ते, पूल, बोगदे, गांव कमानी, इमारती– जिथे जी संधी असेल, ती साधून बांधकामं करायला हवीत. कारण, बांधकामं हाच विकासाचा एकमेव मार्ग आहे, हे आता सर्वमान्य आहे.

ही बांधकामं जेवढी भव्य, त्यावर झालेला खर्च जेवढा अवाढव्य, तेवढी ती जागतिक दर्जाची असतात, हा नवाच समज रूढ झाला असल्याने अशा कोणत्याही विकासकामाचा खर्च अलीकडे दोन–तीन वर्षांतच काही पटींनी, म्हणजे काही हजार कोटींनी वाढतो. ज्याच्या अखत्यारीत हा खर्च वाढतो, तोच खरा विकास पुरुष असतो! त्याच्याच राजकारणाची वेगाने प्रगती होते. त्यामुळे, अशा विकास पुरुषांच्या 'ग्रेट व्हिजन'मध्ये महाअडथळा ठरणारी झाडं, कांदळवनं, राखीव वनं साफ करण्याची मोहीम विविध पातळ्यांवर सर्व ताकदीनिशी सुरू आहेत. विकासाची ही दृष्टी नसणारा मंत्री पर्यावरण विभागाला मिळाला, तर तोही बऱ्याचदा 'झारीतला शुक्राचार्य' ठरू शकतो. अशा 'शुक्राचार्या'ला हटवण्यासाठी उद्योजक – कंत्राटदारंची फळी कामाला लागते. पर्यावरण विभागाचं 'ना हरकत प्रमाणपत्र' हे जणू अशा कोणत्याही विकास प्रकल्पाचा नांगर पर्यावरणावर फिरवण्यासाठी महत्त्वाचं आयुध असतं. ते मिळालं, की बऱ्याच पर्यावरणवाद्यांची तोंडं आपोआप बंद होतात. न्यायालयांनाही या प्रमाणपत्राचा विचार करावा लागतो. हे प्रमाणपत्र मिळण्याची सोय नसती, तर अनेक विकास प्रकल्प अडून राहिले असते, अशी अवस्था आहे! पर्यावरणाचा कळवळा असणाऱ्यांनी जी व्यवस्था हट्टाने जन्माला घातली, ती विकास पुरुषांनी त्यांच्यावरच अशी काही उलटवली आहे, की पर्यावरणवाद्यांना हात चोळत बसण्याशिवाय पर्याय नाही. तरीही कुठलं तरी न्यायालय पर्यावरण, जंगल, झाडझाडोरा, शेती अशा विकास विरोधी गोष्टींविषयी कळवळा दाखवतं आणि सगळा घोळ होतो. मुंबई उच्च न्यायालयाचे प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठाने परवा असाच घोळ घातला. मुंबई – अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी पालघर जिल्ह्यातील नष्ट होणाऱ्या कांदळवनासाठी त्यांनी आपला जुनाट दृष्टिकोन जाहीर टिप्पणीने दाखवून दिला!

बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी पालघर जिल्ह्यात डहाणू ते आंबेसरी दरम्यान १२३ केव्ही वीजवाहिनी टाकायची आहे. या वीज वाहिनीच्या खांबांना मोजून ८४७ खारफुटी झुडपांचा अडथळा होतो आहे. ही खारफुटी आहे, त्या जागेवरून नष्ट करायची आणि त्या बदल्यात आपल्या सोयीने नवी झाडं लावायची, असा कायदेशीर मार्ग उपलब्ध आहे. विकासकामं राबवणारे सर्वच विभाग या नियमाची काटेकोर अंमलबजावणी करत असतात. इथे वीजवाहिनी टाकण्याची जबाबदारी 'महापारेषण'कडे आहे. त्यांना वीजवाहिनीच्या कामासाठी ३.३५ हेक्टर जागेची गरज असून त्यातल्या १,९६५६ क्षेत्रावर खारफुटीची झुडपं आहेत. मार्गात येणारं हे हरित आच्छादन 'महापारेषण'ला हटवायचं असून त्याची भरपाई म्हणून सोलापूर जिल्ह्यात वृक्षारोपण करण्याची त्यांची तयारी आहे. तिथल्या वृक्षारोपणाची जागाही त्यांनी हेरून ठेवली आहे. इकडली खारफुटी साफ करण्यातले अडथळे दूर झाले, की लगेच ती उखडून त्यानंतर आपल्या सोयीने ते सोलापूरमध्ये वृक्षारोपण करतीलच. ज्या प्रकारची झाडं आपण नष्ट करतो, त्याच प्रकारची झाडं लावावी असं बंधन कायद्यात नाही. अन्यथा, दलदलीच्या भागात वाढणारी खारफुटी नष्ट करून सोलापूरसारख्या अवर्षणप्रवण क्षेत्रात पर्यायी लागवडीची योजना त्यांनी आखली नसती! मुंबई हे जगाच्या नकाशावरचं भारताचं महत्त्वाचं शहर. इथे वाढणाऱ्या कॉंक्रीटच्या जंगलाचा दर जगात सर्वाधिक. हे महानगर भकास होऊ नये, त्याचं हरित आच्छादन कायम राहावं, यासाठी खूप कडक निर्बंध घातले गेले आहेत. पण, 'विकासा'चा रेटाच एवढा मोठा आहे, की विकासकांचा नाईलाजच होतो. त्यांची तळमळ बघून संबंधित यंत्रणांचं हृदयही द्रवतं. मग विकासक–कंत्राटदार शे–पन्नास वर्ष वयाच्या डेरेदार वृक्षांची खांडोळी करतात आणि त्या बदल्यात 'पाम ट्री', 'रेन ट्री', पांढरा चाफा यांसारख्या 'महाकाय वृक्षां'ची मोठ्या कुंड्यांमध्ये लागवड आणि निगराणी करतात. डेरेदार वृक्ष हटविण्याचं प्रायश्चित्त म्हणून केलेल्या या वनसेवेने मग यंत्रणांचंही समाधान होतं. एका वृक्षाच्या जागी अशी चार झुडपं लावून मुंबईवर हिरवं आच्छादन घालण्याचं जे महत्कार्य सध्या सुरू आहे, त्याबद्दल संबंधित यंत्रणांचा गौरवही न्यायालयाला आज ना उद्या करावाच लागणार आहे!

घुगे आणि अखंड यांच्या खंडपीठाने वृक्षारोपणांचं पुढे काय होतं? असा एक प्रश्नही सुनावणीच्या ओघात उपस्थित केलेला दिसतो. जिथे जिथे महामार्ग, द्रुतगती मार्ग झाले, तिथे त्यांच्या कडेला वृक्ष संवर्धनाची (केवळ वृक्ष लागवडीची नव्हे) अट होती. कागदोपत्री तिथे जेवढी झाडी आहे, त्याच्या एक हजारांश झाडांची जरी प्रत्यक्षात लागवड असती, तरी या महामार्गांच्या पावसात नद्या झाल्या नसत्या! रस्त्यांकडेच्या वृक्षारोपणाची आणि त्यांच्या देखभालीची कंत्राटं ज्या 'सेवाभावी संस्थां'ना दिली गेली, ती काय 'भावा'ने दिली, आणि त्यांनी ती काय 'भावा'ने पूर्ण केली, याचाही लेखाजोखा एकदा जाहीर झाला.

तर जास्त बेजबाबदार कोण, हे ठरवणं न्यायालयाला सोपं जाईल. पावसाळ्यात वनविभागाकडून आत्तापर्यंत वृक्ष लागवडीची जेवढी लक्ष्य गाठली गेली आहेत, ती पाहता आतापावेतो महाराष्ट्राचं निबिड अरण्य व्हायला हवं होतं! इथे माणसाला चालायला जागा कशी, असा प्रश्न पडायला हवा होता. सादर होणाऱ्या आकडेवारीकडे न्यायालयाने मात्र या दृष्टीने पाहू नये. विकासगंगेच्या मार्गातून झाडं स्वतःहून बाजूला होत नाहीत; त्यामुळे त्यांना हटवण्याशिवाय पर्याय राहत नाही, हा 'विकासवादी दृष्टिकोन' लक्षात घ्यावा, हीच विनंती!

# स्किल इंडिया: केंद्र सरकारचा एक पुढाकार

**केंद्र व महाराष्ट्र राज्याच्या राजधानीपासून शेकडो कोस दूर असलेल्या गडचिरोली जिल्ह्यातील मागास व गरीब कुटुंबातील युवावर्गास असले कौशल्य विकास भकासच करणारे ठरत आहे. कारण येथील तरुणाई स्वबळावर किंवा स्वतःचे भांडवल जमवून उद्योग सुरू करू शकत नाही. जरी बँककर्ज काढून किंवा शासनाच्या अनुदानाच्या भरवशावर उद्योग थाटलाही, तरी मात्र त्याची ती दुकानदारी अल्पावधीतच गारद होईल. विचारा तर खरं, का बरं? म्हणून... अहो, येथे त्या योग्य ग्राहकसंख्याच बोटावर मोजण्याइतकी आहे, मग काय माशा मारणार की काय? हे फक्त सुशिक्षित बेरोजगारांच्या जखमांवर मीठ चोळल्यासारखे झाले. हीच तर खरी अडचण आहे. केंद्र व राज्य शासनाच्या विविध विभागांत कर्मचाऱ्यांच्या रिक्तपदांचा उत्तुंग डोंगर उंचच उंच वाढतच आहे. त्यात भरतीप्रक्रिया राबविल्यास कित्ती बरे होईल, बिच्चारी मागास भागातील सुशिक्षित बेरोजगार तरूणाई पोटापाण्याला लागेल. काही पदांची भरती घेतल्या जाते, मात्र मंत्री, पदाधिकारी व अधिकारी टेबलाखालूनच्या वशिलेबाजीला प्रथम स्थान देतात. त्यातही बिच्चारा हा भुकेकंगाल युवावर्ग मागे पडतो, हीच आजची फार मोठी शोकांतिका! अशी प्रेरक माहिती श्री कृष्णकुमार निकोडे गुरूजींच्या या लेखातून वाचाच... संपादक.**

दरवर्षी साजरा होणारा जागतिक युवा कौशल्य दिन तरुणांना रोजगारासाठी, उद्योजकता बनण्यासाठी प्रोत्साहन देतो. तो तरूणाईच्या अंगी असावे लागणारे कौशल्य सुसज्ज करण्याच्या महत्त्वावर लक्ष केंद्रित करतो. स्किल इंडिया मिशन देखील याच दिवशी सुरू करण्यात आले आहे. जागतिक युवा कौशल्य दिवस हा तांत्रिक, व्यावसायिक शिक्षण–प्रशिक्षणाचे महत्त्व, स्थानिक आणि जागतिक अर्थव्यवस्थेशी संबंधित आहे. या संबंधित कौशल्यासह इतर कौशल्यांच्या विकासाबद्दल जनजागृती करण्याच्या उद्देशाने हा दिवस १५ जुलै रोजी साजरा केला जातो. तरुणांना रोजगार, योग्य काम आणि उद्योजकता या कौशल्यांनी सुसज्ज करणे गरजेचे आहे. हा दिवस वर्तमान आणि भविष्यातील जागतिक आव्हाने सोडविण्यासाठी कुशल तरुणांच्या महत्त्वपूर्ण भूमिकेवर देखील प्रकाश टाकतो. हा दिवस तरूणामधील संवाद, तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षण–प्रशिक्षण संस्था, कंपन्या, नियोक्ते इत्यादींसाठी एक खास संधी प्रदान करतो. भारतातील स्किल इंडिया मिशन देखील या दिवशी सुरू करण्यात आले आहे. स्किल इंडिया हा केंद्र सरकारचा एक पुढाकार आहे, जो युवा कौशल्याचे सबलीकरण करण्यासाठी व त्यांना अधिक रोजगारक्षम बनवण्यासाठी सुरू केलेला आहे. पण रोजगार कुठे आहे हो? संयुक्त राष्ट्र शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संघटना– युनेस्को यांनी जाहीर केलेल्या एका आकडेवारीनुसार जगातील ७० टक्के विद्यार्थी लॉकडाउनमुळे वाईट रीतीने प्रभावित झाले आहेत. अनेक विद्यार्थी ऑनलाइन शिक्षण सुरु झाल्यामुळे साधनांच्या अभावाने शिक्षणापासून वंचित राहिले आहेत. कोविड–१९ या साथीच्या आजारामुळे सद्या ६ पैकी १हून अधिक तरुण कामावर जात नाहीत. अशावेळी जेव्हा तरुणांना रिकव्हरीच्या प्रयत्नास हातभार लावण्याचे आवाहन केले जाते, तेव्हा त्यांना पुढे असलेल्या आव्हानांना यशस्वीरित्या बाजूला करण्यासाठी त्यांना कौशल्यांनी सुसज्ज करणे आवश्यक आहे. जीवघेण्या कोरोना महामारीनंतर युवा कौशल्यावर नवीन विचार करणे गरजेचे आहे.

डिसेंबर २०१४मध्ये संयुक्त राष्ट्र महासभेने ठराव स्वीकारून १५ जुलै हा जागतिक युवा कौशल्य दिन म्हणून घोषित केला. आजच्या तरूणांसाठी बेरोजगारी आणि रोजगाराच्या आव्हानांच्या बाबतीत अधिक चांगली सामाजिक–आर्थिक परिस्थिती प्राप्त करणे, हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे. जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त सन २०२० साली रोटरी क्लब ऑफ बॉम्बेतर्फे प्रशिक्षणार्थींना मोबाईल टॅबलेट वितरणाचा ई–शुभारंभ केला होता. महाराष्ट्रामध्ये दरवर्षी जागतिक युवा कौशल्य दिन– वर्ल्ड युथ स्किल्स डे साजरा करण्यात येत असतो. त्यावेळी विविध ऑनलाईन कार्यक्रम आयोजित करण्यात येत असतात. सर्वात महत्वाचे म्हणजे दोन वर्षांपूर्वी या दिवसाचे औचित्य साधून सलाम बॉम्बे फाऊंडेशन आणि रोटरी क्लब ऑफ बॉम्बेच्या वतीने प्रशिक्षणार्थींना मोबाईल टॅबलेट वितरणाचा ऑनलाईन शुभारंभ करण्यात आला होता. त्याचबरोबर स्किल डेव्हलपमेंट फाऊंडेशन यांच्या वतीने ऑनलाईन वेबिनार तसेच कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता विभागामार्फत फेसबुक आणि युट्यूब लाईव्हद्वारे राज्यभरातील विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यात आला होता. कोरोनाच्या काळात विद्यार्थ्यांना विविध कौशल्य प्रशिक्षणे ऑनलाईन साधनांच्या आधारे देण्याचा मानस त्यावेळी कौशल्य विकास मंत्री नवाब मलिक साहेब यांनी व्यक्त केला होता. सलाम बॉम्बे फाऊंडेशनमार्फत गरीब विद्यार्थी आणि बेरोजगार तरुणांसाठी ब्युटी आणि वेलनेस, विविध घरगुती उपयोगाच्या वस्तुंची दुरुस्ती, मोबाईल रिपेरिंग, बेकरी उत्पादने, ज्वेलरी डिझाईन, माध्यमे, करमणूक आणि क्रीडाविषयक अशी विविध कौशल्य प्रशिक्षणे दिली जातात. काळवेळ पाहून विद्यार्थ्यांना ही प्रशिक्षणे ऑनलाईन दिली जातात. या प्रशिक्षणासाठी ज्या विद्यार्थ्यांकडे मोबाईल फोन नाही, अशा विद्यार्थ्यांना मदत व्हावी; यासाठी रोटरी क्लब ऑफ बॉम्बेमार्फत विद्यार्थ्यांना टॅबलेट देण्यात येतात. यासोबतच सांगली येथील स्किल डेव्हलपमेंट फाऊंडेशन यांच्यामार्फत राज्यभरातील विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन वेबिनार संपन्न झाला. दुपारी कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता विभागामार्फत झालेल्या फेसबुक आणि युट्यूब लाईव्हमध्ये प्रशिक्षणार्थी व संस्थांचा ऑनलाईन गौरव करण्यात आला होता. २१व्या शतकातील तरुणांसाठी बेरोजगारी ही सर्वात मोठी समस्या आहे. सन २०२०च्या ग्लोबल एम्प्लॉयमेंट ट्रेंड्सच्या अहवालानुसार नोकरी नसलेल्या किंवा प्रशिक्षित नसलेल्या तरुणांची आकडेवारी वाढली आहे. कोरोनाचा प्रादुर्भाव पाहता आता राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये ऑनलाईन रोजगार मेळावे घेण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांचा याला चांगला प्रतिसाद मिळत आहे. राज्यात एकही तरुण कौशल्य प्रशिक्षणाशिवाय किंवा रोजगाराशिवाय राहणार नाही यासाठी कौशल्य विकास विभाग व्यापक कार्य करेल, असे श्री मलिक म्हणाले. तसेच कोरोनाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेली आरोग्य कर्मचाऱ्यांची चुगरज लक्षात घेता यासंदर्भातील कौशल्य प्रशिक्षणावर यापुढील काळात अधिक भर देण्यात येईल, असेही मंत्री श्री.मलिक साहेब यांनी त्यावेळी सांगितले होते. शासकीय आयटीआयच्या विद्यार्थ्यांना प्रवेशापासून तर तेथील ट्रेड परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर मिळणाऱ्या कर्जापर्यंत विविध सवलती देण्यात येतात. याउलट राज्यातील अशासकीय आयटीआयच्या विद्यार्थ्यांना प्रवेश शुल्कापासून उत्तीर्ण होऊनही कोणत्याही सवलती मिळत नाहीत. परिणामी एकाच प्रकारचे प्रशिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या दोन गटांत समतोल साधला जाणार कसा? असा सवाल शेवटी उपस्थित होतोच. त्यामुळे सदरील सर्व प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांचा एकसमान विचार करून शासनाने या धोरणावर पुनर्विचार केला पाहिजे, अशी कुजबूज समाजातून ऐकू येत आहे. केंद्र व महाराष्ट्र राज्याच्या राजधानीपासून शेकडो कोस दूर असलेल्या गडचिरोली जिल्ह्यातील मागास व गरीब कुटुंबातील युवावर्गास असले कौशल्य विकास भकासच करणारे ठरत आहे. कारण येथील तरुणाई स्वबळावर किंवा स्वतःचे भांडवल जमवून उद्योग सुरू करू शकत नाही. जरी बँककर्ज काढून किंवा शासनाच्या अनुदानाच्या भरवशावर उद्योग थाटलाही, तरी मात्र त्याची ती दुकानदारी अल्पावधीतच गारद होईल. विचारा तर खरं, का बरं? म्हणून... अहो, येथे त्या योग्य ग्राहकसंख्याच बोटावर मोजण्याइतकी आहे, मग काय माशा मारणार की काय? हीच तर खरी अडचण आहे. केंद्र व राज्य शासनाच्या विविध विभागांत कर्मचाऱ्यांच्या रिक्तपदांचा उत्तुंग डोंगर उंचच उंच वाढतच आहे. त्यात भरतीप्रक्रिया राबविल्यास कित्ती बरे होईल, बिच्चारी मागास भागातील सुशिक्षित बेरोजगार तरूणाई पोटापाण्याला लागेल. काही पदांची भरती घेतल्या जाते, मात्र मंत्री, पदाधिकारी व अधिकारी टेबलाखालूनच्या वशिलेबाजीला प्रथम स्थान देतात. त्यातही बिच्चारा हा भुकेकंगाल युवावर्ग मागे पडतो, हीच आजची फार मोठी शोकांतिका!

!! आंतरराष्ट्रीय युवा कौशल्य दिनाच्या संपूर्ण तरूणाईस हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

**श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी**– दिनविशेषकार.
मु. गडचिरोली, फक्त व्हाॅट्सअॅप– ९४२३७१४८८३.

# शिक्षणतज्ज्ञ सोनम वांगचूक यांच्या उपोषणाकडे सरकारचे दुर्लक्ष चिंताजनक!



**ज्या** क्षेत्रातून देश तयार होतो आणि युवा पिढीचे भविष्य निर्माण होते व लहानाचा मोठा होतो.अशा क्षेत्रात जर पेपर लिक होत असेल आणि त्याचे उत्तरदायित्व सरकार स्विकारण्यास तयार नसेल तर ही बाब लोकशाहीच्या दृष्टीने योग्य नाही.कारण पेपर फुटी हा विद्यार्थांच्या भविष्यावर मोठा धब्बा असून, घणाघाती प्रहार आहे.कारण नीट पेपर लिक प्रकरणात २० ते २५ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या ही देशाला आणि शिक्षण क्षेत्राला काळीमा फासणारी घटना आहे एवढी मोठी घटना होऊनही याकडे सरकार दुर्लक्ष करीत आहे ही अत्यंत गंभीर बाब आहे.याला वाचा फोडण्यासाठी वांगचूक समोर आले आहे. परंतु सरकार त्यांच्याकडे गांभीर्याने लक्ष देण्यास तयार नाही.देशात एवढे मोठे नीट पेपर लिक प्रकरण झाले. परंतू याची जबाबदारी सरकार तिळमात्र स्विकारण्यास तयार नाही ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे. सीजेपीने सुरू केलेल्या आंदोलनाचा २५ वा,तर वांगचुक यांच्या उपोषणाचा १७ वा दिवस १४ जूलैला पूर्ण झाला. अशा परिस्थितीत सरकारने या आंदोलनाकडे दुर्लक्ष न करता, लोकशाहीच्या हिताचा मान ठेवून सीजेपी सोबत चर्चा करणे आवश्यक आहे. सीजेपीच्या मागण्या काय आहे तो नंतरचा प्रश्न.परंतु जनहितार्थ व विद्यार्थ्यांच्या दृष्टीकोणातुन आणि देशाच्या १४५ कोटी जनतेच्या भावनांचा सन्मान व्हावा या दृष्टीने देशापुढे सत्य आणण्यासाठी सरकारची वांगचुक यांच्या उपोषणाच्या बाबतीत चर्चा करणे अत्यंत गरजेचे आहे.

सीजेपीच्या प्रमुख मागण्यामध्ये केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा व परीक्षा गैरव्यवहारांमुळे आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना एक कोटी रूपयांची भरपाई द्यावी व अन्य मागण्या सीजेपीच्या आहेत. या मागण्याच्या बाबतीत सरकारने गांभीर्याने विचार करून तातडीने आंदोलकांशी संवाद साधून चर्चा केली पाहिजे.कारण नीट पेपर असो अथवा टीईटी पेपर फुटी असो यामुळे शिक्षण क्षेत्राची मोठ्या प्रमाणात बदनामी व नाचक्की झाली आहे आणि होत आहे. शिक्षणतज्ज्ञ आणि हवामान कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी लढा देण्याची शपथ घेतली आहे आणि त्या अनुषंगाने त्यांनी देशाची राजधानी दिल्लीतील जंतरमंतर येथे उपोषण सुरू केले.परंतु सरकार त्यांच्या उपोषणाबद्दल कोणत्याही प्रकारची दखल घेत नसल्याचे स्पष्ट दिसून येते. परंतु सरकारची मुजोरी आणि शिक्षणाबद्दलची अवहेलना पहाता सोनम वांगचुक यांनी आपले उपोषण तात्पुरते मागे घेऊन व सर्वांना संघटित करून वेगळ्या मार्गाने लढा दिला पाहिजे. कारण 'जाण है तो जहान है'हा मुलमंत्र अंगिकारून पुढील पाऊल उचलावे.कारण आज देशाला सोनम वांगचुक सारख्या शिक्षणतज्ज्ञाची मोठी गरज आहे.त्यामुळे उपोषण मागे घेऊन वेगळ्या पद्धतीने लढा उभा करावा अशी माझी आग्रहाची विनंती आहे.आतापर्यंत जीतकेही पेपर फुटले ते सर्व भ्रष्टाचाराच्या माध्यमातूनच फुटले आहेत. याकरीता सरकार जोपर्यंत भ्रष्टाचार संपविण्यासाठी उत्तरदायित्व निश्चित करत नाही, तोपर्यंत सर्वच बाबतीत मनमानी,अनियंत्रितपणा आणि चुकीच्या निर्णयाचे हे चक्र सुरूच राहील. हा केवळ शिक्षण व्यवस्थेवरच नव्हे तर संपूर्ण भारतीय समाजावर एक कलंक आहे.जेव्हा परीक्षेचे पेपर फुटतात तेव्हा तुम्हाला डॉक्टर आणि इंजिनिअर कसे मिळणार?हेच डॉक्टर जे पेपर फुटीतुन कॉपी करून पास झाले आहेत.

ते देशातील जनतेचा उपचार करतील आणि इंजिनिअर तुमच्या इमारती बांधतील, ज्यामुळे इमारती धाराशाही होऊन जीवितहानी होईल आणि डॉक्टरच्या चुकीच्या निर्णयामुळे जिवीत हाणी सुद्धा होऊ शकते यालाही नाकारता येत नाही.हा सर्व प्रकार पेपर फुटीतुन उत्पन्न होतो. त्यामुळे शिक्षणतज्ज्ञ श्री सोनम वांगचुक यांच्या उपोषणाचे महत्व समजून आणि त्यांच्या मागण्यांचा गांभीर्याने विचार करून सरकारने तातडीने पाऊल उचलले पाहिजे.कारण आंदोलकांचे योग्य समाधान व्हावे हीच आमची इच्छा.जय हिंद!

**– रमेश कृष्णराव लांजेवार**

# सरसेनापती नेताजी पालकर यांच्या तामसा येथील समाधीस्थळी भव्य स्मारक करा

छत्रपती संभाजीनगर, दि. १६ (प्रतिनिधी) – सरसेनापती नेताजी पालकर हे यांच्या समाधी–स्मृति स्थळाचे ऐतिहासिक महत्त्व आहे.हे ठिकाण त्यांच्या उत्तरायुष्या तील स्मृतीशी जोडलेले असून, तामसा हे त्यांच्या जहागिरीतील महत्त्वाचा भाग मानले जाते. सरसेनापती नेताजी पालकर यांच्या तामसा येथील समाधी स्थळी उच्च दर्जाचे स्मारक करावे अशी मागणी छावा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष किशोरभाऊ चव्हाण आणि मराठा समन्वयक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी महाराष्ट्र शासनाकडे केली असुन त्यासाठी नांदेड जिल्हाधिकारी कार्यालया समोर बेमुदत उपोषण छावा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष किशोर भाऊ चव्हाण आणि मराठा समन्वयक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी सकाळी ११ वाजता सुरु केले आहे.या उपोषनात नांदेड जिल्हा शाखेचे बबन पाटील, दीपक राजुरकर व कैलास शिंदे यांनीही सहभाग घेतला आहे.

सरसेनापती नेताजी पालकरांचे इतिहासात अंत्यन्त उच्च दर्जाचे स्थान होते.नेताजी पालकर हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील प्रमुख मराठा सरदार होते त्यांना इतिहासात प्रतिशिवाजी किंवा दुसरे शिवाजी असेही संबोधले जाते असे त्यांच्या समाधी बाबत तामसा, जिल्हा नांदेड हा उल्लेख अनेक समकालीन/स्थानिक माहितीस्त्रोतांमध्ये आढळतो.

**तामसा येथील इतिहास**

तामसा परिसर हा नेताजी पालकरांच्या जहागिरीशी संबंधित असल्याचा उल्लेख आढळतो, आणि त्यांच्या स्मृतिस्थळा मुळे हे गाव ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे ठरते. हे स्मृतिस्थळ सातत्याने दीर्घकाळ उपेक्षित राहिले असून,तेथे जाण्या साठी मूलभूत सुविधा सुद्धा अपुऱ्या असुन ऐतिहासिक संदर्भ पाहता नेताजी पालकरांनी मराठा सत्तेच्या विस्तारात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.तामसा जिल्हा नांदेड हे केवळ एक गाव नसून, शिवकालीन स्मृती आणि सार्वजनिक जतनधोरण यांच्यातील दुवा आहे म्हणुन तामसा येथील नेताजी पालकरांचे स्मृतिस्थळ हे मराठा इतिहासातील एक महत्त्वाचे स्मारक आहे कारण ते एका पराक्रमी सरदाराच्या जीवनप्रवासाचा शेवटचा भौगोलिक ठाव दाखवते.या स्थळाचा शास्त्रीय इतिहासलेखन, पुरातत्त्वीय नोंदी,आणि स्थानिक मौखिक परंपरा यांच्या आधारे या समाधी स्थळी स्मारक करण्यात यावे अशी मागणी छावा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष किशोर भाऊ चव्हाण आणि मराठा समन्वयक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी महाराष्ट्र शासना कडे केली असुन या दोघानी आणि त्यांच्या मागणी साठी या उपोषनात नांदेड जिल्हा शाखेचे बबन पाटील,दीपक राजुरकर व कैलास शिंदे यांनी ही सहभाग घेतला आहे.या मागणी च्या पूर्तते साठी नांदेड येथे दि.१६ जुलै २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजे पासुन बेमुदत उपोषण सुरु केले आहे.



प्रमुख मागण्या–

१) नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली सर सेनापती नेताजी पालकर स्मारक सल्लागार समिती तात्काळ नियुक्ती करावी.

जिल्हा नियोजन बैठकीपूर्वी या समितीची बैठक पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली घ्यावी.

२) जिल्हाधिकारी नांदेड यांच्या अध्यक्षतेखाली सर सेनापती नेताजी पालकर नियोजन आढावा समिति नियुक्त करून प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी नियोजन आढावा समितीची बैठक घेणे

३) सरसेनापती नेताजी पालकर स्मारकासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (डी पी आर ) तयार करावा

४)सरसेनापती नेताजी पालकर स्मारक पुर्व तयारी करण्या साठी प्रकल्प व्यवस्थापन समिती (पी एम सी ) तात्काळ नियुक्त करावी.

याप्रमाणे शासनाने तात्काळ दखल घेऊन उपरोक्त प्रमाणे कार्यवाही केल्यास एकूण प्रकल्प अहवाल तयार झाल्यावर अपेक्षित असलेले निधीचे नियोजन करणे आधीकचे सोपे होणार असून त्या अनुषंगाने सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करावा अशी मागणी आहे.

**अनेक मान्यवरांनी दिल्या भेटी**

विविध सामाजीक संघटना सह या बेमुदत उपोषणास अभियंता तानाजी हुस्सेकर, हनुमंत पवार, माधवराव पाटील देवसरकर, एनजी कल्याणकर, डॉ.भारती मढवई, डॉ. विद्या पाटील, कल्पना चव्हाण, सुमित्रा वडजकर, अर्चना होगे, सुनिता कल्याणकर, संतोश्री पवार, दीपक पावडे, कैलास शिंदे, दिगंबर हिवराळे, वसंत बालखंड, बबन पाटील, शैलेश शिंदे, दीपक पाटील राजूरकर, इंद्रजीत आवरगंड,कानोबा ध्रुतराज,शेख अहमद शेख लतीफ, राहुल मल्हारी मारुती गवळे, सदा पाटील, विधीज्ञ धोंडीबा पवार, माणिक देशमुख, मारुती भोसले, अभियंता संजय वांगीकर, खुशाल जाधव, तुषार देशमुख, गोविंद पाटील, चंद्रकांत पाटील, श्रीहरी मुंडकर, संजय हंबर्डे, किशोर देशमुख, उद्धव पवार तिरुपती जाधव,शेख सलीम, साहेबराव शिंदे, डॉ. भारत कचरे, डॉ.जी एच आडे राव विवेक ताटे गजानन खतगावकर, सुहास हुक्के, अजय कदम, गोपीनाथ हुस्सेकर, प्रा डॉ प्रभाकर जाधव, प्रा डॉ व्यंकट पावडे, प्रा डॉ आर जी कुंटुरकर, प्रा एन एन मुंडलोड, प्रा.डॉ कमलाकर कणसे, शे. रा. पाटील, प्रवीण कदम, राजेंद्र ताटे,आसमी विवेक ताटे,केरबा जाधव, भुजंग डिगांबर बंडाले यासह अनेक मान्यवरांनी या बेमुदत उपोषणास सक्रिय पाठिंबा दर्शविला आहे.

राज्य शासनाने व पालकमंत्री नामदार अतुल सावे यांनी तात्काळ दखल घेऊन या स्मारका साठी आवश्यक योग्य ते प्रशासकीय निर्णय आणि निधी उपलब्ध करून देण्यासाठी तात्काळ पाऊल उचलावे अशी देखील मागणी उपोषण कर्ते मागणी छावा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष किशोर भाऊ चव्हाण आणि मराठा समन्वयक डॉ.राजेंद्र दाते पाटील यांनी महाराष्ट्र शासना कडे केली आहे.

# छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणात कंत्राटी पदभरतीला विभागीय आयुक्तांची मंजुरी

## पुढील आठवड्यात भरती प्रक्रियेला सुरुवात; नियोजित विकासासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध होणार



छत्रपती संभाजीनगर दि.१६ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सीएसएमआरडीए) अंतर्गत येणाऱ्या गावांचा तसेच झालर क्षेत्राचा नियोजनबद्ध आणि सर्वांगीण विकास अधिक गतिमान करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने कंत्राटी पदभरतीस विभागीय आयुक्त तथा सीएसएमआरडीएचे आयुक्त जी. श्रीकांत यांनी मंजुरी दिली आहे. या भरती प्रक्रियेला पुढील आठवड्यापासून प्रारंभ करण्याचे निर्देशही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

सीएसएमआरडीए कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. बैठकीस सहआयुक्त अंजली धानोरकर, महानगर नियोजनकार हर्षल बाविस्कर, महानगर उपआयुक्त (प्रशासन) लखीचंद चव्हाण यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत बोलताना आयुक्त जी. श्रीकांत यांनी प्राधिकरण क्षेत्रात वाढत असलेली लोकसंख्या, वेगाने होत असलेले औद्योगिकीकरण आणि विविध पायाभूत विकास प्रकल्पांच्या पार्श्वभूमीवर सक्षम मनुष्यबळाची आवश्यकता अधोरेखित केली. नागरिकांना दर्जेदार नागरी सुविधा वेळेत उपलब्ध करून देण्यासाठी तसेच विकासकामांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी रिक्त पदे भरण्यासोबतच अतिरिक्त मनुष्यबळ कंत्राटी पद्धतीने नियुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

ही भरती प्रक्रिया छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या धर्तीवर राबविण्यात येणार असून, त्याद्वारे विविध तांत्रिक, प्रशासकीय आणि सहाय्यक पदांसाठी पात्र उमेदवारांची नियुक्ती केली जाणार आहे.

यावेळी सीएसएमआरडीएमधील नियमित पदभरतीचाही आढावा घेण्यात आला. प्राधिकरणातील वर्ग-एक ते वर्ग-ड अशा एकूण १४७ पदांसाठी सेवा प्रवेश नियमावली तयार करण्यात आली असून, शासनाच्या नियमानुसार नियमित भरती प्रक्रिया राबविण्यासंदर्भात सहआयुक्त अंजली धानोरकर यांनी सविस्तर सादरीकरण केले.

बैठकीत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (पीएमसी) नियुक्ती प्रक्रिया, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या निवडीचे निकष, बाह्यस्त्रोताद्वारे पात्र मनुष्यबळ उपलब्ध करून घेण्याची कार्यपद्धती, आवश्यक शैक्षणिक पात्रता, अटी व शर्ती तसेच संबंधित एजन्सीच्या निवडीबाबतही सविस्तर चर्चा करण्यात आली.

सीएसएमआरडीएमध्ये आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध झाल्यानंतर प्राधिकरण क्षेत्रातील विकासकामांना अधिक गती मिळण्याबरोबरच नागरिकांना आधुनिक, दर्जेदार आणि नियोजनबद्ध नागरी सुविधा प्रभावीपणे उपलब्ध करून देणे शक्य होणार असल्याचा विश्वास बैठकीत व्यक्त करण्यात आला.

# बजाजनगर येथील स्वामी समर्थ मंदिरात धाडसी चोरी

छत्रपती संभाजीनगर दि.१६ (प्रतिनिधी)- बजाजनगर येथील आंबेडकर चौकातील श्री स्वामी समर्थ केंद्र मंदिरात १५ जुलैच्या मध्यरात्री दीड ते चार वाजेच्या मोठी चोरी झाली. चोरट्यांनी मंदिराचे कुलूप तोडून दीड किलोच्या चांदीच्या चरण पादुका, स्वामीच्या गळ्यातील दीड तोळ्याचा सोन्याचा हार आणि तीन दानपेटीतील रोख रक्कम असा लाखो रुपयांचा मुद्देमाल लंपास केला.

या घटनेची माहिती मिळताच शिवसेना नेते, माजी खासदार चंद्रकांत खैरे, उपजिल्हाप्रमुख अरविंद धीवर, शहरप्रमुख विशाल खंडागळे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. यावेळी शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांनी वाळूज पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रामेश्वर गाडे यांना चोरट्यांचा तातडीने शोध लावण्याची मागणी केली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून तपास सुरू केला आहे. याप्रसंगी पंच कमिटी अध्यक्ष संतोष पाटील, गोपाल पाटील, हर्षल बेंडाळे, माजी ग्रामपंचायत सदस्य बजरंग पाटील, उपशहरप्रमुख रतन नलावडे पाटील, विभागप्रमुख अशोक कटारे, शिवसैनिक आत्माराम सातपुते, ओम देशमुख यांच्यासह स्वयंसेवक, शिवसैनिक आणि स्वामी भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, या धाडसी चोरीच्या घटनेमुळे संपूर्ण परिसरात तीव्र संताप व्यक्त होत असून, दिवसभर याच घटनेची चर्चा सुरू होती.

# नगर परिषद वैजापूर जि. छत्रपती संभाजीनगर

फोन नंबर (०२४३६-२२२०३६, फॅक्स नंबर (०२४३६-२२५२५६) Email : npvaijapur@gmail.com

जा.क्र.नपवै/कावि/पापुवस्वावि/२०२६/६४५ दिनांक :-१६/०७/२०२६

## निविदा सुचना

वैजापूर नगर परिषद न.प. फंड व इतर शासकीय निधी अंतर्गत खालील दर्शविलेल्या कामासाठी अनुभवी रजिष्टर्ड गुत्तेदाराकडून/एजन्सी धारकाकडून निविदा मागवित आहे. कोरे निविदा प्रपत्र सुटीचे दिवस वगळून दि.२७-०७-२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यन्त खालील प्रमाणे निश्चित किंमत लेखा विभागात जमा केल्यानंतर नगर परिषद कार्यालयात पाणी पुरवठा व स्वच्छता विभागात मिळतील.

गुत्तेदाराने मोहोरबंद निविदा दोन लिफाफा पध्दतीत (तांत्रिक लिफाफा मध्ये सर्व पात्रते विषयक सर्व कागदपत्रे तसेच निविदा प्रपत्र किंमत व इसारा रक्कम भरले बाबतची पावती सादर करावे. आर्थिक लिफाफामध्ये स्वाक्षरीत दर भरलेले निविदा प्रपत्र सादर करावे) नगर परिषद वैजापूर कार्यालयामध्ये दिनांक २७-०७-२०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यन्त सादर कराव्यात.

१) जमा केलेल्या निविदा प्रपत्र व इसारा रकमेची पावती क्रमांम सिलबंद तांत्रिक व आर्थिक लिफाफावर नमुद करावा, वरील रक्कम भरणा केल्या शिवाय निविदा स्विकारली जाणार नाही. २) इतर अटी व शर्ती तसेच अंदाजपत्रकाची प्रत निविदा प्रपत्रासोबत देण्यात येईल. ३) कोणतीही निविदा कारण न दर्शविता नाकारण्याचा अधिकार न.प.ने राखुन ठेवला आहे.

**कामाचा तपशिल खालील प्रमाणे**

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रक रक्कम | इसारा रक्कम | निविदा प्रपत्र रक्कम | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १ | नगर परिषद वैजापूर पाणी पुरवठा विभागांतर्गत यांत्रिकी विषयक देखभाल दुरुस्ती साहित्य पुरवठासहीत करणे बाबत | -- | १००० | ५०० | १२ महिने |
| २ | पाणी पुरवठा विभागाकरीता आवश्यक पाईप लाईन दुरुस्ती इ.साठी वार्षिक देखभाल दुरुती करणे. | -- | १००० | ५०० | १२ महिने |
| ३ | वैजापूर शहर पाणी पुरवठा वितरण जाळयासाठी वॉल चेंबर बांधणे. | ४९९९०४ | १००० | ५०० | १ महिना |

**स्वाक्षरीत/ -**
**ए.एम. सोनवणे**
**अभियंता, पाणी पुरवठा व स्वच्छता**
**नगर परिषद वैजापूर**

**स्वाक्षरीत / -**
**बि.यु.बिघोत (राजपूत)**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद वैजापूर**

**स्वाक्षरीत / -**
**डॉ. दिनेश पी. परदेशी**
**नगराध्यक्ष**
**नगर परिषद वैजापूर**

**Maharashtra Regional & Town Planning Act, 1966.**

● Notice under section 37 (1AA) read with directives under section 154 of the said Act.

● Proposed modification in Comprehensive Development Control and Promotion Regulations (CDCPR) of MIDC.

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**Urban Development Department, Mantralaya, Mumbai 400 032.**
**Dated:16/10/2025.**

## NOTICE

**No.TPB-4325/207/CR-24/2025/UD-11**

Whereas, the Comprehensive Development Control and Promotion Regulations (CDCPR) (hereinafter referred to as 'the said Regulations') for the Maharashtra Industrial Development Corporation Area have been sanctioned vide Urban Development Department's notification no.TPB-4322/314/C.R.25/2022/UD-11 dated 05/07/2023 and the said Regulations have come into force from 13/07/2023;

And, whereas Regulation 2.2.15 of the said Regulations stipulate about 'Premium Charges' and it contains a provision regarding the options for the payment of premium charges in instalments to be paid to the Authority as per the said Regulations; And Whereas, Note No. (v) under Regulation 2.2.15 stipulate that the aforesaid options regarding payment of premium charges shall be applicable for the period upto 02/12/2024;

And whereas, Government in Urban Development Department has received a letter dated 15/01/2025 from Chief Executive Officer, Maharashtra Industrial Development Corporation (hereinafter referred to as 'the said Authority') wherein it is stated that, *"CREDAI BANM Raigad vide its letter dated 10/01/2025 addressed to the said Authority has stated that the provision to pay FSI premium in instalments is easing the financial burden on builders and facilitating smoother projection execution. Therefore, association has requested to extend this instalment facility which will help developers in maintaining liquidity and ensuring timely completion of projects without compromising the pace of development or quality of construction;* And whereas, in view of the above request of association the said Authority has requested the Government in Urban Development Department to modify the said Regulations by deleting the provision of Note no. (v) given under Regulation 2.2.15;

And Whereas, the similar provisions in this regard are incorporated in Regulation 2.2.14 of the Unified Development Control and Promotion Regulations (hereinafter referred to as 'UDCPR') applicable to the entire State of Maharashtra (except for certain Planning Authorities); And whereas the period for facility of premium charges payment in installments as per this provision is ended on 02/12/2024; And whereas, in view of the request received by Government to continue the facility of premium charges payment in instalments given under this provision, the Government has initiated a modification proposal to UDCPR by issuing a notice dated 11/10/2024 under Section 37 (1AA) along with directives under Section 154(1) of the said Act to make applicable the proposed modification forthwith from the date of the notice;

And whereas, considering the above said facts, proposed amendments in the similar provisions of the UDCPR and the request of the said Authority, the Government in Urban Development Department is of the opinion that in view of streamlining the development in the state, in the public interest, it is expedient to modify the said Regulations by deleting the provision of Note no. (v) given under Regulation 2.2.15 of the said Regulations as specifically described in the Schedule attached herewith (hereinafter referred to as "the Proposed Modification");

Now, therefore, after considering the above facts and circumstances and in exercise of the powers conferred by sub-section (1AA) of Section 37 of the said Act; and of all other powers enabling it in this behalf, Government hereby publishes a Notice for inviting objections/suggestions from any persons with respect to the Proposed Modification, as required by clause (a) of sub-section (IAA) of Section 37 of the said Act, for information of all persons likely to be affected thereby. The Government is further pleased to inform that any objections/ suggestions in respect of the Proposed Modification mentioned in the Schedule attached herewith may be forwarded, before the expiry of one month from the date of publication of this Notice in the Maharashtra Government Gazette, (hereinafter referred to as "the said period") to the Concerned Joint Director of Town Planning. Any objections / suggestions, which may be received within the said period will be dealt with in accordance with the provisions of sub-section (IAA) of Section 37 of the said Act by the Concerned Joint Director of Town Planning, who is hereby authorised as an "officer" on the behalf of Government to hear objections / suggestions which are received and say of the said Corporation, as the case may be and submit his report to the Government;

Further, the Government hereby issues directives under Section 154(1) of the said Act that, pending sanction to the Proposed Modification under clause (C) of Section 37(1AA) of the said Act by the Government, the Proposed Modification shall come into force forthwith.

This Notice under sub-section (1AA) of Section 37 of the said Act shall also be available on the Govt. of Maharashtra website: www.maharashtra.gov.in (Acts/Rules).

By order and in the name of the Governor of Maharashtra,

**Sd**
**(Amar Patil)**
**Under Secretary to Government**

## SCHEDULE

Accompaniment to the Government in URan Development Department Notice No. TPB-4325/207/C.R.24/2025/UD-11, dated:-16/10/2025.

| Regulation No. | Existing Provision | Proposed Provision |
|---|---|---|
| 2.2.15 Premium Charges<br><br>Note (v) | (v) The aforesaid options shall be applicable for the period upto 02.12.2024 | ---<br>(This provision is proposed to be deleted.) |

**Sd/-**
**(Amar Patil)**
**Under Secretary to Government.**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६**

* उक्त अधिनियमाचे कलम ३७ (१कक) खालील सूचनेसह कलम १५४ अन्वये निदेश.

* म.औ.वि. महामंडळाचे सर्वंकष विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीस (CDCPR) मधील प्रस्तावित फेरबदलाबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**मंत्रालय, मुंबई : ४०० ०३२,**
**दिनांक :- १६/१०/२०२५**

## सूचना

क्र. टिपीबी-४३२५/२०७/प्र.क्र.२४/२०२५/नवि-११

ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रासाठीचे सर्वंकष विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीस (CDCPR) (यापुढे याचा उल्लेख 'उक्त नियमावली' असा करणेत आलेला आहे) शासन नगर विकास विभागाकडील दि.०५/०७/२०२३ रोजीचे अधिसूचन्वये मंजूरी देण्यात आली असून, सदर नियमावली दि.१३/०७/२०२३ पासून अंमलात आली आहे;

आणि, ज्याअर्थी उक्त नियमावलीचे विनियम २.२.१५ 'Premium Charges' संदर्भात असून, त्यामध्ये उक्त नियमावलीतील तरतुदीनुसार प्राधिकरणास भरणा करावयाच्या अधिमूल्य रक्कमेचा भरणा हप्त्यांमध्ये करणेसंदर्भातील पर्यायाबाबत तरतुद आहे; आणि ज्याअर्थी, विनियम २.२.१५ खालील टिप क्र. (v) मध्ये अधिमूल्याचे शुल्क हप्त्याने भरणा करण्यासबंधीचे पर्याय दि. २/१२/२०२४ पर्यंत लागू राहतील अशी तरतूद आहे;

आणि ज्याअर्थी, मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे (यापुढे याचा उल्लेख 'उक्त प्राधिकरण' असा करणेत आलेला आहे) दि. १५/०१/२०२५ रोजीचे पत्र शासन नगर विकास विभागास प्राप्त झाले असून, त्यामध्ये नमूद आहे की, *'अध्यक्ष, क्रेडाई बीएएनएम् रायगड यांचे दि.१०/०१/२०२५ रोजीचे उक्त प्राधिकरणास सादर केलेल्या पत्रामध्ये चटई क्षेत्र निर्देशांकासाठी आकारावयाचे अधिमूल्य हप्त्यांमध्ये भरण्याची तरतूद विकासकांवरील आर्थिक भार कमी करेल आणि त्यामुळे प्रकल्पांची अंमलबजावणी सुलभरित्या होऊ शकेल. त्यानुषंगाने विकासाच्या गतीमध्ये तसेच बांधकामांच्या गुणवत्तेशी तडजोड न करता प्रकल्प वेळेवर पूर्ण करणे सुनिश्चित होण्याचे दृष्टीने हप्त्याचे सुविधेचा कालावधी वाढविण्याची विनंती केली आहे';* आणि ज्याअर्थी, उक्त विनंतीच्या अनुषंगाने उक्त प्राधिकरणाने उक्त नियमावलीचे २.२.१५ मधील टिप क्र. (v) रद्द करण्यासंबंधी उक्त नियमावलीमध्ये फेरबदल करण्याबाबत विनंती केली आहे;

आणि ज्याअर्थी, आणि ज्याअर्थी, यासंदर्भातील तरतूद संपुर्ण महाराष्ट्र राज्याकरिता (काही नियोजन प्राधिकरणे वगळता) लागू असलेल्या एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमध्ये (यापुढे याचा उल्लेख 'UDCPR' असा करणेत आलेला आहे) विनियम ११.२.५ मध्ये अंतर्भूत करण्यात आली आहे; आणि ज्याअर्थी, सदर तरतुदीनुसार अधिमूल्य शुल्काचे हप्त्याने भरणा करण्यासंबंधीचा कालावधी दि. २/१२/२०२४ रोजी संपुष्टात आला आहे; आणि ज्याअर्थी, सदर तरतुदीनुसार अधिमूल्य शुल्काचे हप्त्याने भरणा संबंधीची सुविधा कायम ठेवणेबाबत शासनास प्राप्त झालेल्या विनंती विचारात घेऊन शासनाने विचारात घेऊन, त्याअनुषंगाने UDCPR मध्ये फेरबदल करण्यासाठी फेरबदल प्रस्ताव कार्यान्वित करुन त्यासंबंधी उक्त अधिनियमाचे कलम ३७ (१कक) अन्वये सूचना दि.११/१०/२०२४ निर्गमित करण्यात आली असून सदर प्रस्तावित फेरबदल लगोलग लागू करण्याकरीता सदर सूचनेसोबत उक्त अधिनियमाचे कलम १५४ (१) अन्वये निदेश देण्यात आले आहेत:

आणि ज्याअर्थी, उक्त वस्तुस्थिती, UDCPR मधील यासंबंधीच्या तरतुदींमध्ये प्रस्तादिन फेरबदल व उक्त प्राधिकरणाची विनंती विचारात घेता, राज्यातील विकासामध्ये सुसुत्रता असण्याचे दृष्टीने सोबत जोडलेल्या परिशिष्टामध्ये दर्शविल्यानुसार उक्त नियमावलीचे विनियम २.२.१५ खालील टिप क्र. (v) रद्द करणेबाबत उक्त नियमावलीमध्ये फेरबदल करणे सार्वजनिक हिताचे दृष्टीने आवश्यक आहे, असे शासन नगर विकास विभागाचे मत झाले आहे. (यापुढे याचा उल्लेख 'प्रस्तावित फेरबदल' असा करणेत आलेला आहे);

आणि त्याअर्थी, उपरोक्त परिस्थिती आणि वस्तुस्थिती विचारात घेता आणि उक्त अधिनियमाच्या कलम ३७ च्या पोट कलम (१कक) अन्वये प्राप्त अधिकार आणि त्या संदर्भातील सर्व शक्तींचा वापर करुन, शासन याद्वारे प्रस्तावित फेरबदलाविषयी उक्त अधिनियमाच्या कलम ३७, पोट कलम (१कक) चे खंड (क) नुसार कोणत्याही व्यक्तीकडून हरकती / सूचना मागविण्यासाठी तसेच संभाव्य बाधित होणाऱ्या व्यक्तींच्या माहितीसाठी सदर सूचना प्रसिध्द करीत आहे. शासनाकडून असेही कळविणेत येत आहे की, खालील परिशिष्टात नमूद प्रस्तावित फेरबदलाविषयी कोणत्याही हरकती / सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात सदर सूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत संबंधित सहसंचालक, नगर रचना यांचेकडे पाठविण्यात याव्यात. सदर प्राप्त हरकती / सूचनांवर सुनावणी देवून तसेच लागू असेल त्याप्रमाणे उक्त महानगरपालिकेचे म्हणणे घेवून त्यावरील अहवाल शासनास सादर करण्यासाठी संबंधित सहसंचालक, नगर रचना, यांना शासनाचे वतीने 'अधिकारी' म्हणून प्राधिकृत करण्यात येत असून त्यांच्याकडे सदरच्या कालावधीत प्राप्त होणा-या हरकती/सूचना यावर उक्त अधिनियमाच्या कलम ३७ च्या पोट कलम (१कक) अन्वये कार्यवाही करण्यात येईल;

शासन याद्वारे उक्त अधिनियमाचे कलम १५४ (१) अन्वये निर्देश देत आहे की, उक्त अधिनियमाचे कलम ३७ (१कक) चे उपकलम (ग) अन्वये प्रस्तावित फेरबदलास शासन मान्यता प्रलंबित असेपर्यंत प्रस्तावित फेरबदल लगोलग अंमलात येईल.

उक्त अधिनियमाचे कलम ३७ (१कक) अन्वये सदर फेरबदलाची सूचना महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in (कायदा / नियम) या वेबसाईटवर देखील प्रसिध्द करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**स्वाक्षरीत/ -**
**(अमर पाटील)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

## परिशिष्ट

**(शासन नगर विकास विभाग सूचना क्र. टिपीबी-४३२५/२०७/ प्र.क्र.२४/२०२५/नवि-११, दिनांक - १६/१०/२०२५ सोबतचे परिशिष्ट)**

| विनियम क्रमांक | विद्यमान तरतूद | प्रस्तावित तरतूद |
|---|---|---|
| 2.2.15 Premium Charges<br><br>Note (v) | (v) The aforesaid options shall be applicable for the period upto 02.12.2024 | ---<br>(This provision is proposed to be deleted.) |

**स्वाक्षरीत/ -**
**(अमर पाटील)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

विमाका/छत्रपती संभाजीनगर/जाहि/५७/२०२६-२०२७